वर्ष- १२ अंक- २२ मुंबई, मंगळवार,१४ एप्रिल २०२६ ते २० एप्रिल २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

भीम जयंती पर्व

3 → नुकसान टाळण्यासाठी अनावश्यक खरेदी टाळा!

धक्कादायक! पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं वैतरणा धरणात दोन तरुण ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

‘खरात प्रकरणात’ बुधवारी मोठा खुलासा?

१८२५ संपर्कांवरून खळबळ, प्रभावशालींचा सहभाग असल्याचा अंजली दमानिया यांचा दावा

मुंबई : दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण व आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या भोंदूबाबा अशोककुमार खरात प्रकरणात बुधवारी मोठा खुलासा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी खरातच्या संपर्कात असलेल्या तब्बल १८२५ जणांची यादी जाहीर करण्याचा इशारा दिल्याने या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे.

दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार, या संपर्क यादीत आयजी दर्जाचे पोलीस अधिकारी, तहसीलदार, डेप्युटी कलेक्टर तसेच काही प्रभावशाली राजकीय व्यक्तींचाही समावेश



असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ गुन्हेगारीपुरते मर्यादित नसून, त्याचे धागेदोरे सत्ताकेंद्रांपर्यंत पोहोचत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, या प्रकरणाच्या तपासासाठी सक्तवसुली संचनालय (ईडी) कडून राज्यातील ११ ठिकाणी छापेमारी करण्यात येत असून, आर्थिक व्यवहार व अन्य पुराव्यांचा मागोवा घेतला जात आहे. शिर्डी पोलीस ठाण्यात संबंधित काही व्यक्तींची चौकशीही सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दमानिया या बुधवारी पत्रकार परिषद घेऊन खरातचे कॉल रेकॉर्ड्स, एसएमएस व्यवहार तसेच कथित राजकीय संबंधांचे पुरावे सादर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या खुलाशानंतर प्रकरणात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर, अंधश्रद्धेच्या आडून चालणाऱ्या गैरप्रकारांवर तसेच प्रभावशाली व्यक्तींच्या कथित सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, तपास यंत्रणांसमोर या प्रकरणाचा छडा लावण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

बारमध्ये पैसे उडवण्याच्या सवयीमुळे निवडला चोरीचा मार्ग; तीन सराईत चोरट्यांना महात्मा फुले पोलिसांनी गोवंडीतून केली अटक

कल्याण - कल्याणमध्ये धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बारमध्ये पैसे उडवण्याच्या सवयीमुळे तीन जणांनी चोरीचा गुन्हा केला. या सराईत चोरट्यांना कल्याणमधील महात्मा फुले पोलिसांनी पोलिसांनी अटक केली आहे. रामबाग परिसरात एका नामांकित हॉटेल चालकाचा गळ्यातील महागडी चेन हिसकावून तीन चोरटे फरार झाले होते. ही घटना परिसरातील सीसीटीव्हीत कैद झाली होती.त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली.पोलिसांनी सापळा रचत एका बारमधून तिघांना ताब्यात घेतले. दिलनवाज अन्सारी,रिजवान खान आणि शाहरुख शेख अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे आणि महात्मा



फुले चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालकृष्ण परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी विकास मडके यांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी मुंबईतील गोवंडी परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचत एका बारमधून तिघांना ताब्यात घेतले. दिलनवाज अन्सारी,रिजवान खान आणि शाहरुख शेख अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे,या तिघांना बारमध्ये जाऊन पैसे उडवण्याची सवय असून त्यासाठीच ते चोरी आणि लूटमार करत असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. दरम्यान,या आरोपींनी आतापर्यंत आणखी किती चोरी आणि लूटमार केल्या आहेत, याचा सखोल तपास पोलीस अधिकारी विकास मडके यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

मानकोली ब्रिजवर स्टंटबाजी; रील बनवणाऱ्या तिघांवर कारवाई



डोंबिवली: विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीतील मानकोली ब्रिज परिसरात धोकादायक स्टंटबाजी करून त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्या तिघांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. संबंधितांनी होंडा ॲक्टिवा (टल्ल 05 एव 8768) या दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करत जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने वाहन चालवून त्याची ‘रील’ तयार करून इंस्टाग्रामवर प्रसारित केली होती.

या प्रकरणी गणेश राजू फोंडा रेड्डी (वय २२), कबीर मच्छिंद्र नेतकर (वय २२) आणि यश नितेश मालवणकर (वय २३, तिघेही रा. डोंबिवली पश्चिम) यांचा शोध घेऊन त्यांना विष्णुनगर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.

पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कलम १८४ (धोकादायक वाहन चालविणे), १२८ (दुचाकीवर प्रवाशांची मयार्दा) व १२९ (हेल्मेट वापरासंबंधी नियम) अंतर्गत कारवाई केली आहे. तसेच संबंधित दुचाकी ट्राफिक पोलिसांच्या मदतीने जप्त (इंपाऊंड) करण्यात आली आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून स्टंटबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

दहशतवादी संघटनेशी संबंध असलेल्या 2 संशयितांना कुर्ला आणि ठाण्यातून अटक




मुंबई, एका संयुक्त कारवाईत महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या ह्यस्पेशल सेलह्नने एका दहशतवादी संघटनेशी संबंध असलेल्या दोन संशयितांना अटक केली आहे. या दोन्ही आरोपींनी तरुणांना ऑनलाइन माध्यमातून कट्टरपंथी बनवण्यात आणि त्यांना देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी चिथावण्यात सक्रिय भूमिका बजावली होती, असे वृत्त आहे. तसेच गेल्या वर्षी दिल्लीत झालेल्या स्फोटात या दोन संशयितांचा काही सहभाग होता का? याचाही तपास यंत्रणांकडून केला जात आहे. महत्त्वाचे म्हणजे ही संपूर्ण कारवाई गुप्तचर माहितीच्या आधारे पार पाडण्यात आली.

महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या पथकांनी ठाण्यातील खडवली आणि मुंबईतील कुर्ला परिसरात एकाच वेळी छापे टाकले आणि दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींच्या ताब्यातून आक्षेपार्ह कागदपत्रे, मोबाईल फोन आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आल्याचे समजते. प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे की, हे आरोपी परदेशात तसेच भारतातील विविध भागात कार्यरत असलेल्या हँडलरच्या संपर्कात होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई दोन दिवसांपूर्वी करण्यात आली आहे. तसेच ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही संशयितांना दिल्लीला नेण्यात आले असून दिल्ली पोलिसांचा ‘स्पेशल सेल’ तिथे त्यांची कसून चौकशी करत आहे. तपासादरम्यान असेही निष्पन्न झाले आहे की, हे दोन्ही आरोपी ओडिशातून कार्यरत असलेल्या एका दहशतवादी ‘मॉड्यूल’शी (गटाशी) जोडलेले आहेत. या मॉड्यूलचे जाळे खूपच व्यापक असू शकते, असा संशय तपास यंत्रणांना आहे.

दरम्यान, अलीकडच्या काळात मुंबई आणि आसपासच्या परिसरात संशयित व्यक्तींविरोधात केल्या जाणाऱ्या कारवायांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अगदी गेल्याच महिन्यात पाकिस्तानशी संबंध असलेल्या एका दहशतवादी संघटनेबाबतच्या संशयावरून महाराष्ट्र एटीएसने मुंबई उपनगरांमधील चार ठिकाणी छापे टाकले होते. महाराष्ट्र एटीएसने गोवंडीमध्ये तीन ठिकाणी आणि कुर्ल्यामध्ये एका ठिकाणी छापे टाकताना चौकशीसाठी चार संशयितांना ताब्यात घेतले होते. हे संशयित बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेच्या आणि पाकिस्तानी सूत्रधारांच्या संपर्कात असल्याचा तसेच एखाद्या मोठ्या कटाची आखणी करत असल्याचा महाराष्ट्र एटीएसला संशय होता. त्यामुळे आता अलीकडच्या काळातील अटकसत्र आणि गेल्या महिन्यात केलेल्या कारवाया यांच्यातील दुवा जोडून संपूर्ण दहशतवादी जाळे उलगडण्याचा प्रयत्न तपास यंत्रणांकडून केला जात असल्याचे समोर येत आहे.



भीमजयंती पर्व



'भीमजयंती' अर्थात आनंदोत्सव ! 'माणसा'ला माणूसपण देणारा, जन्मोजन्मीसाठी कृतार्थता, धन्यता पावलेला हा दिवस म्हणजे चौदा एप्रिल. महामानव, बोधिसत्व या भारत भूमीचा कोहिनूर हिरा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस अर्थातच भीमजयंती ! प्रचंड अभ्यास करून, मानवतेसाठीचे लढे देऊन, मानापमान सहन करून देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळविणारे जगविख्यात घटनातज्ज्ञ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोट्यवधी जनमाणासांना ज्यांनी अंधाराच युग संपवून प्रकाशयात्री बनविले. तो आमचा आदर्श आज जन्माला आला असा हा क्रांतदर्शी दिवस म्हणजेच भीमजयंती ! बाबासाहेब म्हणजे प्रेरणेचा स्त्रोत, आदर्शाच एक वलयांकित क्षितिज म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! ह्या महामानवाच्या जीवनावर दृष्टिक्षेप टाकला तर आपल्या लक्षात येईल. जगामध्ये श्रीमंत शहर असलेल्या अमेरिकेच्या न्युयॉर्क शहरात बाबासाहेब विद्यार्थी दशेत वास्तव्याला होते. पुढे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिक्स' या नामांकित इन्स्टिट्युशन मध्ये लोकशाहीची जननी समजल्या जाणाऱ्या लंडन या राजधानीच्या महागड्या शहरात बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी, संशोधनासाठी राहिले, परंतु कधीही त्या संस्कृतीचा आपल्यावर प्रभाव पडू दिला नाही. स्वेच्छेने निश्चितच काही चांगल्या गोष्टी स्वीकारल्या कारण स्वतःच्या परिवारासाठी कमी परंतु अस्पृश्य, दबल्या पीडलेल्या समाजाच्या उत्थानासाठी, उत्कर्षासाठी ध्येयधुंद वृत्तीने डॉ. बाबासाहेब सदोदित कार्यमग्न राहिले. (परिणामी कुटुंबाकडे दूर्लक्ष झाले. माता रमाई व तिची चार पोरं गेली.) चैनीचं विलासी जीवन कुणाला नको असतं? कोण कवी बाबासाहेबांच्या संदर्भात आपल्या कवनातून लिहितो, 'भरले असते मी माझे घर, शंभराच्या नोटांने परंतु मेला असता समाज माझा सदा उपाशी पोटाने' अहोरात्र अभ्यास करुन त्या रमाईच्या साहेबांनी अर्धपोटी राहून पावावर दिवस काढले. ती माऊली अनेकदा उपाशी झोपली म्हणून आज आपण सोन्याचा घास खात आहोत. शुध्द पाणी पीत आहोत. पूर्वाश्रमीच्या महारांचा इतिहास पहा आपल्या लक्षात येईल. किती दीन-दरिद्री आपल्या वाट्याला होती. बाबासाहेबांनी त्या महागड्या तळाच्या पाण्याला 'चवदार' केलं. काय नाही दिलं? घासा-घासात, श्वासा-श्वासात बाबासाहेब आहेत. एखादी आई जेवढी बाळाची काळजी करते, त्यापेक्षा अधिक काळजी बाबासाहेबांनी समाजाची केली होती. खरचं हा युगविधाता सोसायटीसाठी व राष्ट्रासाठी चंदननासारखा झिजला आहे. शब्दातीत असा बाबासाहेबांचा त्याग, समर्पण आणि संघर्ष आहे. आधुनिक जगाच्या इतिहासात अनेक महापुरुष झाले. त्यांचे त्यांच्या क्षेत्रात काम आहे; परंतु अनेक आघाड्यांवर दीपस्तंभ होऊन प्रकाशवाट दाखविणारा महापुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरच ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस आम्हीच नव्हे तर जगातल्या अनेक राष्ट्रात जयंती म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आम्ही त्यांच्या अनुयायांनी हे लक्षात ठेवले पाहिजे. की स्वतः किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी बाबासाहेबांचा जन्मदिवस (वाढदिवस) कधी साजरा केला का? हा विचारणीय प्रश्न आहे. कधी मोठे फलक लावले का? आतिषबाजी केली का? प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत असे दिमाखदार समारंभ झाले नाहीत. ह्या वरकरणी, वेळखावू आणि आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या बाबींची बाबासाहेबांनी कटाक्षाने नोंद घेतली आहे. त्यांच्यापुढे जाण्याची बिशाद कुणाची आहे का? एकदा, बाबासाहेबांचे मराठी साहित्यातले ख्यातनाम लेखक तथा पत्रकार मित्र, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी व त्यांच्या सोबतच्या काही जवळच्या सहकाऱ्यांनी बाबासाहेबांना विनंती केली की, आम्ही तुमचा जन्मदिवस साजरा करणार आहोत. तुम्हाला हे व्यक्तिशः आवडणार नाही पण आमची विनंती मान्य करा त्यानिमित्ताने तुम्ही काही संदेश द्या, भाषण करा व ते भाषण आपल्या जनतेसाठी प्रकाशित करता येईल, तेव्हा बाबासाहेबांनी आपल्या हयातीत तो जन्मदिवस पुर्वसंधेला (जयंतीच म्हणावी) साजरा झाली. दि. तेरा एप्रिल एको. सत्तेचाळीसला ज्येष्ठ पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक मित्र प्र. के. यांनी 'आंबेडकर विशेषांक' 'नवयुग' काढला. त्यामध्ये 'भारताचा महान मूर्तिभंजक' अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या शीर्षकाच्या मथळ्याखाली प्र. के. अत्रेनी लिहिले आहे, 'नवयुगच्या सहस्त्रावधी वाचकांच्या वतीने आंबेडकरांच्या पंचावन्नाव्या वाढदिवशी अत्यंत आदराने आम्ही त्यांना अभिवादन करतो आणि उत्तम आरोग्य अन् दीर्घ आयुष्य लाभो असे अंतःकरणापासून आम्ही इच्छितो. डॉक्टर आंबेडकर यांच्या अगाध बुध्दिमत्तेबद्दल, विशाल विद्वतेबद्दल आणि प्रचंड कर्तृत्वाबद्दल आमच्या मनात पहिल्यापासूनच नितांत आदर आहे.' अशा प्रकारचे उद्गार बाबासाहेबांच्या हयातीत जन्मदिवसाचे औचित्य साधून अत्रे निवेदन करतात. पुढे बाबासाहेबांच्या थोरवीबद्दल ते लिहितात, डॉ. आंबेडकरांएवढा प्रचंड बुध्दीचा, विद्वतेचा आणि कर्तृत्वाचा दुसरा एकही महाराष्ट्रीय माणूस आज आम्हाला दिसत नाही.... महार जातीत जन्माला आलेला हा माणूस वृत्तीने, व्यासंगाने आणि अधिकाराने ब्राह्मणापेक्षाही अधिक श्रेष्ठ आणि पवित्र असा ब्राह्मण आहे !

एवढेच नव्हे तर 'ब्रह्मर्षि' या श्रेष्ठ पदवीपर्यंत जाऊन तो पोहोचलेला आहे. पहा, किती मोठेपणा आहे. बाबासाहेबांचा, कर्मठ हिंदूवादी नेते पं. मदनमोहन मालवीय बाबासाहेबांना त्यांची विद्येची देवता सरस्वती ते बाबासाहेबांची प्रचंड विद्वत्ता पाहून म्हणतात, 'बाबासाहेब हे सरस्वतीचे पुत्र आहेत.' हे बाबासाहेबांच्या ज्ञानाचं, प्रतिभेचं वलय आहे व ते गांधी - नेहरू पटेल असू देत किंवा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, किंवा श्री. म. माटे हे सारेच लीन झालेत बाबासाहेबांपुढे... आम्ही बाबासाहेबांचा सर्वश्रेष्ठ आदर्श मनस्वी स्वीकारलेला आहे. म्हणून सांगणे आहे. आम्ही कसे वर्तन करावे? कसा व्यवहार करावा याचे धडे आम्हाला बाबासाहेबांनी दिले आहेत. आंबेडकरी समाज सर्व समाजाचा आदर्श व्हावा अशी आमची वाणी पाहिजे. कर्तृत्व, सदाचार, प्रज्ञा, शिल, करुणेची त्रिवेणी, वीण आम्हाला आचरणात आणता आली पाहिजे. फक्त त्या आदर्श पुरुषाचा जयजयकार करून चालायचे नाही.

जय-पराजयाच्या धुंदीतून आम्हाला पुढे जायचे आहे. कट्टर आंबेडकरवादी, सिने में फौलाद है, आंबेडकर की औलाद है, बाप तो बाप रहेगा ह्यातून युवक - युवतीने पुढे निघा, अभ्यास करा, नैतिकता जपा, चारित्र्याला जपा, स्वाभिमानाचे जीवन जगा, लाभापेक्षा इज्जत प्यारी आहे, भाकरीपेक्षा स्वाभिमान महत्त्वाचा आहे असे बाबासाहेब म्हणतात त्यासाठी आम्ही जगले पाहिजे. आपला संबंध समाज हा उत्सवप्रिय आहे असला पाहिजे ती चांगली गोष्ट आहे. आम्हाला उत्सवाचे भरतं येतं पण ओसरल्यावर पुढे काय? भीमजयंती पवार्चा आनंद अनुभवा. पुरण पोळीच जेवण जेवा. बाबासाहेबांच्या जन्माचा निश्चितच आनंद आहे. त्या आनंदाला परस्परात वाटा. एकमेकांना प्रेम द्या. बुध्दाची करुणा एकमेकांत ओता मेत्ता (मैत्रीची) भावना वाढीस घाला. समाज चिंतन मांडा. आपण कुठवर आलो आहोत. याच सिंहावलोकन करा.

इतर समाज आपणास नावे ठेवणार नाही असे वागा, आपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत ही फार मोठी अदृश्य शक्ती आहे, चेतना आहे यांच स्मरण आपणास असू द्या. आज देहरुपाने बाबासाहेब आपल्यात नाहीत पण त्यांचा लाख मोलाचा आदर्श आम्ही जतन करून आचरणात आणला पाहिजे. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीतून ज्या बाबी निसटल्या आहेत. (शेवटी बाबासाहेबही माणूस आहेत.) अधुऱ्या राहिलेल्या आहेत त्या आम्ही पूर्ण करण्यासाठी झटलो तर आमचे जीवन धन्य होईल, आमच्या जगण्याचे सार्थक होईल. मोठी खंत वाटते काय अवस्था आहे. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या 'पीइएस' मुंबईची? समता सैनिक दल का अंकुचन पावत आहे? कुठे आहे. बाबासाहेब आंबेडकरांची धम्म चळवळ गतिमान करणारी संस्था 'दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया?' आम्ही तुकडे पाडण्यात मोठे पटाईत. बाबासाहेबांच्या स्वप्न संकल्पनेतला पक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हा एकेकाळी काँग्रेस सारख्या महाशक्तिशाली पक्षाला धडकी भरवणारा पक्ष. आम्ही गटागटात वाटून धुळीस मिळवला.

दुसरीकडे दरवर्षी आम्ही ग्रामीण आणि नागरी भागात, उपनगर महानगरात अक्षरशः हजारो कोटी रुपये बाबासाहेबांच्या नावावर खर्ची घालतो. (उधळपट्टी) करतो. काय रचनात्मक काम केलयं बाबासाहेबांना अपेक्षित असणार काम आम्ही किती केलं? हा खरा प्रश्न आहे. फक्त जयंतीमध्ये डीजेच्या तालावर ठेका धरल्यान जमणार आहे का? लगाव, बजाओ म्हणल्याने जमणार आहे का? याचा अर्थ नृत्य करायचं नाही का? नृत्य करा आनंदातच माणूस नाचतो. मोर उन्हाळ्यात नाचत नाही. वर्षा ऋतुत मेघ दाटून आले की, मोर आनंदून थुई थुई नाचतो. तसाच तो आमच्या आनंदाचा बहर आहे भीमजयंती ! आम्हाला विस्मरण होऊ नये ते बाबासाहेबांच्या तत्त्वविचारांच, त्यांच्या आदर्शवत मार्गदर्शनाचं त्यांच्या उर्वरित कायार्चं म्हणून आम्हाला सजग राहायचं आहे. काळ मोठा कठीण आणि आव्हानात्मक आहे. देशामध्ये प्रतिक्रांतीची लाट आलेली आहे. आम्हाला बाबासाहेबांचा आदरयुक्त धाक पाहिजे. त्यांची भव्य तेजस्वी मुद्रा पाहून कुणीही विनम्र व्हावं झुकून अभिवादन करावं असं काळजातले नाव म्हणजे बाबासाहेब आंबेडकर ! भीमजयंतीचं स्वरुप आता बदलायची वेळ आली आहे. दोन तीन दशकापूवीर्ची साध्या पध्दतीची प्रचंड उत्साही वातावरणातली भीमजयंती आता पुन्हा नव्याने आली पाहिजे. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाने प्रदुषण होत आहे. वयोवृध्दांना त्रास होत आहे. ग्रामीण भागात झगडे होत आहेत. नशापान करून डीजेच्या धुंदीत नाचणारे अनियंत्रित होत आहेत. हे आनंदामध्ये पडणारे विरजण आम्ही थांबवले पाहिजे. आम्ही आमची जबाबदारी ओळखली पाहिजे. यादृष्टीने मार्गक्रमण केलं पाहिजे. अंतिमतः त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी त्रिवार अभिवादन करून संबंध जनतेला भीमजयंतीच्या मनःपूत खूप खूप सदिच्छा देतो.

बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे तुम्ही हे घरगुती उपाय नक्की करून पहा.



आले : सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

तुळस : ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.

चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय



चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.

अननस : चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.



आहार : आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, काबोर्नेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.



कोरफड : चेहऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

टी ट्री - ऑलिव्ह ऑइल : एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.

हृदयाला निरोगी ठेवतो : लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकेजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.



सर्दी आणि पडसं दूर करते : हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

इम्युन सिस्टीमला मजबूत करते : लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

डायरियापासून बचाव : कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.

डिटॉक्स : हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

फंगल इन्फेक्शन : फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक : हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.

साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.

रिफाइंड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.



दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १४ एप्रिल २०२६ ते २० एप्रिल २०२६

संपादकीय

नुकसान टाळण्यासाठी अनावश्यक खरेदी टाळा!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना 'सजग आणि तयार राहा' असे आवाहन केले असले तरी त्याचा अर्थ लॉकडाऊन नव्हे, तर ऊर्जा आणि पुरवठा व्यवस्थेबाबत पूर्वतयारी असा आहे. तज्ञांच्या मते, ही परिस्थिती 'एनर्जी वॉर'पेक्षा 'इकॉनॉमिक वॉर्निंग' अधिक आहे, ज्यामध्ये भारताने संतुलित धोरण अवलंबणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांसाठीही ही वेळ संयम आणि जागरूकतेची आहे. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचा आधार घेणे आणि अनावश्यक खरेदी टाळणे अत्यंत गरजेचे आहे. इराण-अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक स्तरावर तणावाचे वातावरण निर्माण झाले असून त्याचे पडसाद भारताच्या अर्थव्यवस्थेवर उमटू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती 100-110 डॉलर प्रति बॅरलच्यावर गेल्यामुळे भारताच्या आयात खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, ज्याचा परिणाम महागाई, पेट्रोल-डिझेल दर आणि वाहतूक खर्चावर होऊ शकतो. रुपयादेखील डॉलरच्या तुलनेत कमकुवत होत असून आर्थिक बाजारात अस्थिरता वाढताना दिसत आहे. शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर घसरण आणि परकीय गुंतवणूकदारांची माघार यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, सोशल मीडियावर 'एलपीजी टंचाई' आणि 'पुन्हा लॉकडाऊन'सारख्या अफवा वेगाने पसरत असल्या तरी सरकारने त्या पूर्णपणे फेटाळून लावल्या आहेत. अधिकृत माहितीनुसार भारताकडे सध्या 50-60 दिवसांचा पुरेसा इंधन साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारच्या तातडीच्या टंचाईची शक्यता नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना 'सजग आणि तयार राहा' असे आवाहन केले असले तरी त्याचा अर्थ लॉकडाऊन नव्हे, तर ऊर्जा आणि पुरवठा व्यवस्थेबाबत पूर्वतयारी असा आहे. तज्ञांच्या मते, ही परिस्थिती 'एनर्जी वॉर'पेक्षा 'इकॉनॉमिक वॉर्निंग' अधिक आहे, ज्यामध्ये भारताने संतुलित धोरण अवलंबणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांसाठीही ही वेळ संयम आणि जागरूकतेची आहे. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचा आधार घेणे आणि अनावश्यक खरेदी टाळणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या काळातील जागतिक राजकारण हे पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीचे, गतिशील आणि परस्परावलंबी झालेले दिसून येते, ज्यामध्ये कोणत्याही एका प्रदेशातील घडामोडींचा परिणाम संपूर्ण जगावर होऊ शकतो. विशेषतः मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थिती ज्यात इराण, अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष केंद्रस्थानी आहे ही केवळ प्रादेशिक राजकारणाची बाब राहिलेली नसून ती जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा, सामरिक संतुलन आणि राष्ट्रीय धोरणांवर दूरगामी परिणाम करणारी ठरली आहे. या संघर्षाचे स्वरूप पारंपरिक युद्धापुरते मर्यादित नसून त्यामध्ये आर्थिक दबाव, राजनैतिक अलगाव, तांत्रिक आघाड्या आणि माहिती युद्ध यांसारख्या विविध घटकांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत 'होर्मुझ सामुद्रधुनी'चे सामरिक महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते, कारण ही सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा वाहतुकीचा एक प्रमुख मार्ग आहे आणि तिच्यावर निर्माण होणारी कोणतीही अस्थिरता ही जागतिक तेलबाजारात तात्काळ परिणाम घडवून आणू शकते. भारतासारख्या देशासाठी, ज्याची ऊर्जा रचना मोठ्या प्रमाणावर आयातीवर आधारित आहे, हा मुद्दा अत्यंत संवेदनशील ठरतो. याचबरोबर चाबहार बंदरासारखे प्रकल्प भारताच्या भूराजकीय धोरणाचा भाग बनले आहेत. ते केवळ व्यापारासाठी नव्हे तर सामरिक स्वायत्ततेसाठीही महत्त्वाचे ठरतात. दुसरीकडे, देशांतर्गत स्तरावर 'लॉकडाऊन सारख्या उपाययोजनां बाबत निर्माण होणाऱ्या चर्चामुळे सामाजिक आणि मानसिक पातळीवरही परिणाम दिसून येतात, ज्यांचे वास्तव आकलन करणे आवश्यक आहे. या सर्व घटकांचा एकत्रित विचार केल्यास हे स्पष्ट होते की सध्याची परिस्थिती ही केवळ संघर्षाची नसून ती 'एनर्जी जिओपॉलिटिक्स', 'सप्लाय चेन डायनॅमिक्स' आणि 'स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट' यांचा एक समन्वित खेळ आहे, ज्यामध्ये राष्ट्रांनी केवळ तात्कालिक प्रतिसाद न देता दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक ठरते. मध्यपूर्व हा प्रदेश ऐतिहासिकदृष्ट्या संसाधनांवरील नियंत्रण, धार्मिक-राजकीय मतभेद आणि जागतिक शक्तींमधील स्पर्धा यामुळे सतत अस्थिर राहिलेला आहे, आणि सध्याचा इराण-अमेरिका-इस्त्रायल तणाव हा या दीर्घकालीन संघर्षाच्या नवीन आणि अधिक गुंतागुंतीच्या टप्प्याचे प्रतिनिधित्व करतो. अमेरिकेने इराणच्या अणुकार्यक्रमावर, क्षेपणास्त्र क्षमतेवर आणि प्रादेशिक प्रभावावर आक्षेप घेत कठोर निर्बंध आणि दबावाची धोरणे अवलंबली आहेत, तर इस्त्रायलने थेट लष्करी कारवायांच्या माध्यमातून इराणच्या धोरणात्मक क्षमतांना मर्यादित करण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर इराणनेही आपली प्रतिकारशक्ती दाखवत क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांद्वारे प्रत्युत्तर दिले आहे, ज्यामुळे संघर्षाचे स्वरूप अधिक व्यापक आणि धोकादायक झाले आहे. भारताची ऊर्जा रचना ही मोठ्या प्रमाणावर आयातीवर आधारित असल्यामुळे जागतिक ऊर्जा बाजारातील कोणतीही अस्थिरता देशासाठी थेट आव्हान निर्माण करते. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे 85 टक्के गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते, आणि या आयातीचा मोठा भाग मध्यपूर्वेतील देशांमधून येतो, ज्यासाठी 'होर्मुझ सामुद्रधुनी' हा प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे या मार्गातील तणाव हा भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी अत्यंत संवेदनशील ठरतो. तथापि, भारताने या जोखमीला कमी करण्यासाठी ऊर्जा विविधीकरणाचे धोरण स्वीकारले आहे, ज्यामध्ये रशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील देशांकडून तेल आयात वाढविणे, तसेच पर्यायी स्रोतांचा शोध घेणे यांचा समावेश आहे. याशिवाय, 'स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व' उभारून अल्पकालीन धक्क्यांचा सामना करण्याची क्षमता विकसित करण्यात आली आहे, ज्यामुळे तातडीच्या पुरवठा संकटात स्थैर्य राखणे शक्य होते. भारताच्या भूराजकीय धोरणात चाबहार बंदर प्रकल्पाला विशेष स्थान आहे, कारण या प्रकल्पाच्या माध्यमातून भारताला पाकिस्तानला वळसा घालून अफगाणिस्तान आणि मध्य आशियात थेट प्रवेश मिळतो, ज्यामुळे व्यापार, ऊर्जा आणि सामरिक सहकार्य यासाठी नवीन मार्ग उपलब्ध होतो. यामुळे चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरला एक पर्याय निर्माण होतो आणि भारताची प्रादेशिक उपस्थिती अधिक मजबूत होते. आखाती देशांमध्ये काम करणाया सुमारे 1 कोटी भारतीयांच्या सुरक्षेबाबत चिंता या मुद्द्यांवर व्यापक चर्चा सुरू आहे, सोशल मीडियावर पसरलेल्या अफवांमुळे 'पॅनिक बायिंग'ची प्रवृत्ती वाढून कधी कधी कृत्रिम टंचाई निर्माण होते, ज्यामुळे पुरवठा साखळीवर अनावश्यक ताण येतो. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, भारताकडे सध्या सुमारे 50-60 दिवस पुरेल इतका स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम साठा उपलब्ध आहे, असे प्रशासकीय पातळीवरून वारंवार सूचित करण्यात येत आहे. तसेच रशिया, आफ्रिका आणि इतर देशांकडून तेल आयात करण्याचे पर्याय उपलब्ध असल्यामुळे तात्काळ संकटाची तीव्रता मर्यादित असल्याचे दिसून येत आहे, मात्र सोशल मीडियाच्या माध्यमातून अनावश्यक 'पॅनिक बायिंग'ची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. या पार्श्वभूमीवर भारतामध्ये पुन्हा लॉकडाऊन लागणार का, हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर चर्चेत असला तरी त्याचे उत्तर स्पष्टपणे नाही असेच आहे, कारण लॉकडाऊन हा उपाय मुख्यतः सार्वजनिक आरोग्य आणीबाणी उदा. महामारी यासाठी वापरला जातो. ऊर्जा किंवा भू-राजकीय संकटासाठी तो व्यवहार्य मानला जात नाही. त्याऐवजी सरकार संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन इंधन रेशनिंग, वर्क फ्रॉम होम, सार्वजनिक वाहतुकीचे नियमन, अनावश्यक प्रवासावर निर्बंध आणि ऊर्जा बचतीचे उपाय यांसारखी मर्यादित धोरणात्मक पावले उचलू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तयारी ठेवा असे केलेले आवाहन हे लॉकडाऊनचा इशारा नसून ऊर्जा, अन्न आणि पुरवठा साखळी सुरक्षेबाबत पूर्वतयारी करण्याचा सल्ला म्हणून पाहिले पाहिजे. आजच्या बदलत्या जागतिक परिस्थितीत मध्यपूर्वेतील तणाव हा केवळ युद्धाचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो 'एनर्जी वॉर' आणि 'इकॉनॉमिक वॉर्निंग' यांचा एकत्रित संकेत बनला आहे. इराण-अमेरिका-इस्त्रायल संघर्षामुळे तेलाच्या किमती, डॉलरचा दबाव आणि पुरवठा साखळीतील अडथळे यांचा थेट परिणाम भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर होताना दिसतो. मात्र, या गंभीर परिस्थितीत जितका वास्तवाचा प्रभाव आहे, तितकाच अफवांचाही प्रभाव समाजावर पडताना दिसतो, इंधन व एलपीजी टंचाई, लॉकडाऊनची भीती आणि बाजारातील अस्थिरता याबाबत अनेक गैरसमज पसरताना दिसतात. अशा वेळी नागरिकांनी घाबरण्याऐवजी परिस्थितीचे तर्कशुद्ध विश्लेषण करणे, अधिकृत माहितीवर विश्वास ठेवणे आणि संयम राखणे अत्यंत आवश्यक ठरते. कारण ही वेळ घाबरण्याची नसून तयारीची आहे, ऊर्जा वापरात शिस्त, आर्थिक नियोजन आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधत भारताने या जागतिक आव्हानाला संधीमध्ये रूपांतरित करण्याची गरज आहे. ऊर्जा विविधीकरण, रणनीतिक साठे आणि संतुलित परराष्ट्र धोरण यांसारख्या उपाययोजनांमुळे भारताने या संकटाचा सामना करण्याची क्षमता विकसित केली आहे. देशांतर्गत स्तरावर 'लॉकडाऊन'सारख्या चर्चांकडे तर्कशुद्धपणे पाहणे आवश्यक आहे, कारण अशा उपाययोजना ऊर्जा संकटासाठी उपयुक्त नसतात. त्याऐवजी मर्यादित आणि लक्षित उपाययोजना अधिक प्रभावी ठरतात. याशिवाय, नागरिकांनी अफवांपासून दूर राहून संयम आणि जबाबदारीने वागणे हीदेखील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वाची बाब आहे. दीर्घकालीन दृष्टीने, ऊर्जा स्वावलंबन, तांत्रिक प्रगती आणि धोरणात्मक स्वायत्तता यावर भर देणे आवश्यक आहे, ज्यामुळे बाह्य धक्क्यांचा परिणाम कमी करता येईल. त्यामुळे सध्याची परिस्थिती ही केवळ आव्हान म्हणून न पाहता ती एक संधी म्हणून स्वीकारणे अधिक योग्य ठरेल. ज्यामध्ये भारत आपली क्षमता आणि धोरणात्मक दूरदृष्टी वापरून अधिक स्थिर, सक्षम आणि स्वावलंबी राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकतो.

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा नवा मार्ग: प्रमुख शासकीय योजनांचा आढावा

भारताच्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीत आदिवासी बांधवांचे योगदान अमूल्य आहे. महाराष्ट्रातील दुर्गम भागातील आदिवासी समाज मुख्य प्रवाहात यावा, त्यांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावावा, यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या जातात. शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार या चतुःसूत्रीवर आधारित या योजनांचा घेतलेला हा विशेष आढावा.

1) खावटी कर्ज योजना: कठीण काळातील आधार:

आदिवासी बांधवांना पावसाळ्यात किंवा रोजगाराच्या अभावी अन्नाची टंचाई भासू नये, यासाठी 'खावटी कर्ज योजना' अत्यंत महत्त्वाची ठरते. पूर्वी हे कर्ज स्वरूपात होते, परंतु आता त्याचे स्वरूप बदलून ती 'अनुदान' स्वरूपात राबविली जाते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना रोख रक्कम आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा (उदा. डाळी, तेल, साखर, मसाले) केला जातो. ही योजना विशेषतः भूमिहीन शेतमजूर आणि दुर्गम भागातील कुटुंबांना उपासमारीपासून वाचवण्यासाठी कवच म्हणून काम करते.

2) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (विहीर योजना):

शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ही योजना राबवली जाते. 'क्रांतीनायक बिरसा मुंडा' यांच्या नावाने चालणाऱ्या या योजनेअंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना नवीन विहीर खोदण्यासाठी, जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी किंवा इनवेल बोअरिंगसाठी मोठे अनुदान दिले जाते. याशिवाय, सौर पंप किंवा वीज जोडणीसाठीही मदत केली जाते, जेणेकरून शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता बारमाही शेती करून स्वतःचे उत्पन्न वाढवू शकेल.

3) शबरी आदिवासी घरकुल योजना: हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न

'प्रत्येकाला हक्काचे घर असावे' या उद्देशाने 'शबरी आदिवासी घरकुल योजना' राबवली जाते. ज्या आदिवासी कुटुंबांकडे स्वतःचे पक्के घर नाही किंवा जे कच्च्या झोपड्यांमध्ये राहतात, त्यांना या योजनेतून पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. ही योजना केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून, नागरी क्षेत्रातील गरजू आदिवासींनाही याचा लाभ दिला जातो. यात घराच्या बांधकामासोबतच स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयासाठीही अतिरिक्त निधी दिला जातो.

4) शासकीय आश्रम शाळा समूह योजना:

आदिवासी मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच दर्जात्मक शिक्षण मिळावे, यासाठी 'शासकीय आश्रम शाळा' चालवल्या जातात. या शाळांमध्ये निवास, भोजन, गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचा सर्व खर्च शासन उचलते. 'समूह योजना' (Cluster Scheme) अंतर्गत अनेक आश्रमशाळांना एकत्र जोडून तिथे अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे आणि संगणक कक्ष उपलब्ध करून दिले जात आहेत, जेणेकरून आदिवासी विद्यार्थी जागतिक स्पर्धेत टिकू शकतील.

5) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ योजना:

आदिवासी तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी हे महामंडळ कणा म्हणून काम करते. स्वयंरोजगारासाठी कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. छोटे व्यवसाय, वाहन खरेदी, किंवा कृषी आधारित उद्योग सुरू करण्यासाठी हे महामंडळ 5 लाख ते 20 लाखांपर्यंतचे कर्ज विविध योजनांच्या माध्यमातून उपलब्ध करून देते. यामुळे आदिवासी तरुणांची सावकारी पाशातून सुटका होऊन ते स्वतःच्या पायावर उभे राहत आहेत.

6) आदिवासी महिला सशक्तिकरण योजना:

महिला ही कुटुंबाचा कणा असते. आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी ही विशेष योजना आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. तसेच हस्तकला, वनौपज (उदा. महुवा, मध, डिंक) प्रक्रिया उद्योग आणि कुक्कुटपालनासाठी विशेष अनुदान व बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. यामुळे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.

7) पोलीस व सैनिक दल भरती पूर्व प्रशिक्षण योजना:

देशसेवा आणि सुरक्षितता क्षेत्रात आदिवासी तरुणांचा सहभाग वाढवण्यासाठी ही एक क्रांतिकारी योजना आहे. अनेक आदिवासी तरुणांमध्ये शारीरिक क्षमता उत्तम असते, परंतु योग्य मार्गदर्शना अभावी ते भरती प्रक्रियेत मागे पडतात. या योजनेअंतर्गत तरुणांना शारीरिक चाचणीचे सराव आणि लेखी परीक्षेचे मोफत मार्गदर्शन दिले जाते. प्रशिक्षणा दरम्यान निवास आणि भोजनाची सोयही सरकार मार्फत केली जाते, ज्यामुळे पोलीस आणि सैन्य दलात आदिवासींचे प्रमाण वाढत आहे.

8) शेळ्या व मेंढ्या गट पुरवठा योजना:

अल्पभूधारक आणि भूमिहीन आदिवासींसाठी पशुपालन हा उत्पन्नाचा उत्तम स्रोत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 10 शेळ्या आणि 1 बोकड अशा गटाचा पुरवठा केला जातो. यासाठी 75% ते 90% पर्यंत शासकीय अनुदान दिले जाते. या उद्योगासाठी फार मोठ्या जागेची किंवा भांडवलाची गरज नसते, त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना ही योजना आर्थिक स्थैर्य मिळवून देत आहे.

शासनाच्या या सर्व योजना केवळ कागदावर नसून, त्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे ही प्रशासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. 'जल, जंगल आणि जमीन' यांच्याशी नाते सांगणारा आदिवासी समाज जेव्हा या आधुनिक योजनांशी जोडला जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने राज्याचा आणि देशाचा समतोल विकास साधला जाईल.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी बांधवांनी नजीकच्या 'एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प' कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

' प्रगतीचा हा नवा अध्याय, आदिवासींच्या समृद्ध भविष्याचा पाया आहे'.

लेखक
राजु परशुराम भोये

मराठी शाळा व संस्कृती वाचवणार कोण?



काही वर्षांपूर्वीची गोष्ट, मुंबईतील मराठमोळ्या ग्रँट रोड परिसरात राहणारे माझे मित्र किस्सा सांगत होते. मराठी भाषेचा अभिमान म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीला ग्रँट रोड येथील एका नामांकित मराठी शाळेत प्रवेश घेतला. काही वर्षे गेल्यानंतर अचानक एक दिवस त्या शाळा व्यवस्थापनाने मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला व तसे पालकांना कळवले. माझे मित्र धडाडीचे कार्यकर्ते होते. ग्रँट रोड सारख्या मराठमोळ्या विभागातील नामांकित मराठी शाळा बंद पडते म्हणून त्यांनी थेट तेथील कार्यकर्त्यांना हाताशी धरले व शाळा व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी शाळेत पोहोचले. प्रथम वादावादी झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली व सुचवले की आम्ही मराठी शाळा सुरू ठेवण्यास तयार आहोत,फक्त तुमची जबाबदारी विद्यार्थी आणून देण्याची राहील, ते झाले तरच आम्ही शाळा सुरू करू शकतो, हे सांगताच सर्वच विषयावर पडदा टाकावा लागला. कारण त्यावर ना पालकांकडे उत्तर होते ना शाळा व्यवस्थापकांकडे. या सवार्ला जबाबदार होती ती पालकांची द्विधा मानसिकता. असो. विषय असा, की मराठी शाळा असो किंवा मराठी संस्कृती असो ती टिकवायची कोणी त्याचे खापर प्रशासनावर फोडायचे, की त्याची सर्वस्वी जबाबदारी आपण जनतेने घ्यावी का? याला नेमके जबाबदार कोण? घरात मराठी हवी मात्र बाहेर पडल्यावर हिंदी अथवा इंग्रजीतच बोलावे ही सध्याची मानसिकता. मग आपण प्रशासनाकडे का बोट दाखवायचे. त्यातही आपल्या आजूबाजूला मराठीसाठी व मराठी संस्कृती टिकण्यासाठी झटणारे बरेच असतात त्यातलंच एक मराठी अभ्यास केंद्र. आजच विषय का काढावा लागला कारण मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत हे मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते. यांनी नुकतीच पालिका आयुक्तांची भेट घेतली. कारण होते मराठी शाळा बंद पडण्याच्या विषयावर मुंबई महापालिका आयुक्तांची भूमिका काय? विषयाला चांगली सुरुवात झाली असताना मात्र आयुक्तांनी घुमजाव केले असा या मराठी अभ्यास केंद्राचा आरोप आहे. पालिकेच्या सहा शाळांचा खासगीकरणाचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. त्यात पालिकेच्या शाळा फक्त सीबीएससी व आयसीएससी का? यामुळे प्रादेशिक माध्यमांच्या शाळा बंद पडतील असा धोकाही व्यक्त करण्यात आला. यावर पालिका आयुक्त गगराणी यांच्या मते या सहा शाळांचा विषय म्हणजे शाळांचे खासगीकरण नाही तर भूखंडाचे खासगीकरण आहे. या चुकीच्या बातम्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्याबाबतचे सादरीकरण त्यांच्या माध्यमातून केले गेले. पालिकेकडे पडलेले भूखंड चटईक्षेत्र निदेर्शानुसार बदल्यात जे उपलब्ध होतात तो हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण मराठी शाळांचा आग्रह धरू नये का? असा प्रश्न विचारला तेव्हा गगराणी यांनी हा आग्रह आम्हाला धरायचा नाही असे स्पष्ट म्हटले व हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगितले.गगराणी यांनी मुंबईतील कुठलीही इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यास त्याच काय करायचं हे महापालिकेचे धोरण आहे असे म्हटले. परंतु, शाळांची इमारत वर्षानुवर्षे पूर्ण होत नाही ही वस्तुस्तिथी आयुक्तांना पटली. पाडकाम करणाऱ्या शाळांच्या बाबतीत पालकांना विश्वासात घेतले जात नाही अशी भूमिका मांडली गेली असता गगराणी यांनी ही भूमिका बरोबर असल्याचे मान्य करत पालकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिले. सगळी मुलं विस्थापित झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. दीड वर्षे मुलांची फरपट झाली ही भूमिका स्पष्टपणे मांडली. गगराणी यांनी समन्वयाचा अभाव असल्याबाबत मान्य केले. यानंतर समन्वयाचा अभाव राहणार नाही त्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. मुंबई पब्लिक स्कूलचा जो प्रयोग मुंबई महानगरपालिका करत आहे तो थांबवण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. सीबीएससी किंवा इतर मंडळाच्या ज्या शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या सुरू करण्याबाबत याबाबत भूमिका मांडली व त्या काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा याबाबत चर्चा झाली. मराठी भाषा संवर्धन समिती स्थापन करण्याबाबत भूमिका मांडली गेली. अंगणवाड्यांसोबत जोडून घेऊन मराठी अभ्यास केंद्राला काम करता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली व प्रस्ताव ठेवण्यात आला. मुंबई महानगरपालिका मराठीसाठी जे काही काम करते त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्याचं असं म्हणणं होतं की मुंबई महानगरपालिका मराठी शाळांसाठी काहीच करत नाही, असं जे चित्र उभं केलं आहे ते चुकीचं आहे. पालिका मराठीसाठी काय काय करतं याची जंत्रीच पालिका आयुक्तांनी मांडली. तर मुंबई महानगरपालिका परिपत्रक आदेश मराठी काढतात, विविध दिन साजरे करतात, विविध प्रकाशने काढतात, मराठीचा वापर, अभिनय स्पर्धा घेतात, साहित्य संमेलनाला मदत करतात, कर्मचाऱ्यांच्या विविध परीक्षा घेतात, प्रत्येक खात्यात मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला आहे, पुस्तके विक्री करतात, नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना ५० टक्के सूट देतात, कर्मचाऱ्यांसाठी अभिनय स्पर्धा राबवतात गगराणी यांनी खासगी संस्थांच्या शाळा सुद्धा बंद पडत आहेत असं म्हटलं आहे. त्यांनाही तुम्ही विचारलं पाहिजे असं सुचवलं. मराठी शाळा का बंद पडत आहे. हा सामाजिक प्रश्न आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. फक्त आमच्या शाळेची संख्या कमी होत आहे असे नाही, तर इतर खासगी शाळा सुद्धा बंद पडत आहेत. गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत महानगरपालिकेच्या मराठी शाळांचा ९५ टक्के इतका निकाल लागला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीत ९७ टक्के इतके गुण पटकावले आहेत. यासोबतच गुणवत्ता वाढ, सराव परीक्षा असे उपक्रम राबविण्यात येतात. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाचे फी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांना २७ प्रकारच्या शैक्षणिक वस्तूंचे मोफत वाटप केले जाते. महानगरपालिकेचा विद्यार्थी खासगी शाळेपेक्षाही अधिक गुणसंपन्न आणि त्याच्याकडे विविध शैक्षणिक सुविधा असाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्न करते. पालिकेने फाऊंडेशनल लिटरसी व न्यूमरसी निपूण भारतअंतर्गत महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमुळे तिसऱ्या इयत्तेतील प्रत्येक माध्यमाचा विद्यार्थी उत्तम प्रकारे वाचू शकतो. तसेच, त्या-त्या स्तरावरील गणिताचे ज्ञानही त्याला उत्तमरीत्या अवगत होत आहे. यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून याच चांगले परिणाम दिसून येत आहे. मुंबईतील मराठी शाळा आणि शिक्षण हा सामजिक आणि शैक्षणिक मुद्दा आहे. पालिका प्रशासनाकडून कोणत्याही माध्यमांच्या शाळांचे खासगीकरण करण्यात आले नाही, असा दावा केला. तरीही मुंबई उपनगरातील मराठी शाळा बंद पडत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात अन्यथा आज पालिका आयुक्तांनी मराठी शाळेबाबत व सर्वस्वी मराठीबाबत आपले भूमिका मांडली. येणाऱ्या काळात ती मांडण्याची संधी मुंबईकरांना मिळणार नाही हे निश्चित.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १४ एप्रिल २०२६ ते २० एप्रिल २०२६

धक्कादायक! पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं वैतरणा धरणात दोन तरुण बुडाले



नाशिक, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीत धक्कादायक घटना घडली आहे. वैतरणा धरणात नाशिक येथील दोन तरुण बुडाल्याची घटना घडली आहे. वैतरणा धरणालगत असलेल्या धबधब्याखाली चार मित्र पाण्यात उतरले होते. मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला. मात्र, त्याला वाचवण्याचा प्रयत्नात दुसराही बुडाल्याची घटना घडली आहे. स्थानिकांच्या मदतीने दोघांचा शोधकार्य सुरु करण्यात आले आहे.

वैतरणा धरणात युवक बुडाल्याची घटना घडल्यामुळं परिसरात खळबळ

मागील वर्षी याच ठिकाणी अशाच प्रकारची घटना घडली होती. मात्र, पुन्हा एकदा धरण परिसरात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, वैतरणा धरणात युवक बुडाल्याची घटना घडल्यामुळं परिसरात खळबळ उडाली आहे. पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला होता. त्याला वाचवण्यासाठी गेलेला दुसरा युवक देखील पाण्यात वाहून गेला आहे. या दोघांचे शोधकार्य सुरु करण्यात आले आहे.

एन-६ सिडको परिसरात मध्यरात्री गोळीबार...
तरुण पुरोहिताने स्वतःच्याच डोक्यात...





छत्रपती संभाजीनगर। शहरातील सिडको एन-६ परिसरातील साईनगर येथे काल रात्री उशिरा गोळीबाराची एक थरारक घटना घडली. ३१ वर्षीय समीर नाईक या तरुणाने राहत्या घरात स्वतःवर गोळी झाडून घेतल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

नेमकी घटना काय?

समीर नाईक हा आपल्या आई आणि लहान भावासोबत साईनगरमध्ये भाड्याच्या घरात राहतो. तो व्यवसायाने पौरोहित्य करतो. घटनेच्या वेळी तो आपल्या कुटुंबासोबत होता. घटनेच्या वेळी समीरची आई आणि लहान भाऊ आपल्या बांगड्यांच्या दुकानी होती. घरात समीर एकटाच असताना हा धक्कादायक प्रकार घडला. रात्री उशिरा जेव्हा समीरचा लहान भाऊ घरी परतला, तेव्हा त्याला समीर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. त्याच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता आणि शेजारीच एक पिस्तूल पडलेले आढळून आले. नैराशातून पाऊल उचलल्याचा संशय घटनेची माहिती मिळताच सिडको पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

प्राथमिक तपासानुसार, समीरने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

घटनास्थळी पोलिसांना दारूच्या रिकाम्या बाटल्या आणि भांगेच्या गोळ्या आढळून आल्या आहेत. ३१ वर्षाचा होऊनही अद्याप लग्न न झाल्यामुळे समीर गेल्या काही दिवसांपासून नैराश्यात होता, अशी माहिती समोर येत आहे. याच नैराश्यातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

पोलीस तपास सुरू

या घटनेबाबत माहिती देताना सिडको पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी सांगितले की, "घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक पोहोचले असून तपास सुरू आहे. समीरने वापरलेले पिस्तूल बेकायदेशीर आहे की अधिकृत, तसेच यामागे अन्य काही कारण आहे का, याचा शोध घेतला जात आहे." समीरच्या या कृत्यामुळे परिसरात दहशतीचे आणि हळहळीचे वातावरण पसरले आहे. रुग्णालय प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, समीरची प्रकृती अद्यापही चिंताजनक असून डॉक्टर त्याला वाचवण्याचे शथीर्चे प्रयत्न करत आहेत.

उत्तर प्रदेशात अटक झालेल्या संशयित दहशतवाद्याचा मुंबईशी संबंध उघड...
सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर



मुंबई। उत्तर प्रदेशात 4 एप्रिल रोजी अटक करण्यात आलेल्या 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया' संबंधित एका संशयित दहशतवाद्याचा मुंबईशी संबंध असल्याचे उघड झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. उत्तर प्रदेश एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या संयुक्त मोहिमेदरम्यान कुशीनगर येथे पकडण्यात आलेल्या रिझवानला यापूर्वी मुंबई पोलिसांनी एका दहशतवाद-संबंधित गुन्ह्यात अटक केली होती. तपास यंत्रणा आता त्याचे जुने जाळे (नेटवर्क) आणि मुंबईशी असलेले त्याचे दुवे यांची पुन्हा नव्याने तपासणी करत आहेत.

उत्तर प्रदेश एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या संयुक्त पथकाने 'आयसिस'शी या संघटनेशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या 30 वर्षीय रिझवानला शनिवारी (4 एप्रिल) रात्री कुशीनगर जिल्ह्यातील पडरौना परिसरातून अटक केली. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेली माहिती आणि सतत पाळत ठेवण्यात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. तसेच परिसरात भीतीचे वातावरण पसरू नये म्हणून ही अटक अत्यंत गुप्तपणे करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रिझवानचा दहशतवाद-संबंधित कारवायांमध्ये सहभाग असल्याचा इतिहास आहे आणि त्याचे मुंबईशी थेट संबंध आहेत. 2016 मध्ये एका दहशतवाद-संबंधित गुन्ह्यात मुंबई पोलिसांनी त्याला अटक केली होती आणि 2023 पर्यंत तो तुरुंगात होता. तरुणांची माथी भडकवून त्यांना 'आयसिस'मध्ये सामील होण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप त्याच्यावर होता. तपास यंत्रणांच्या मते अयाज सुलतान नावाच्या एका तरुणाची माथी भडकवण्यातही त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यानंतर अयाज सुलतान हा 'आयसिस'मध्ये सामील होण्यासाठी भारत सोडून गेला होता.


दरम्यान, तुरुंगातून सुटका झाल्यानंतर रिझवान आपल्या मूळ गावी म्हणजेच कुशीनगर जिल्ह्यात परतला आणि त्याने पडरौना येथे खाण्याच्या पदार्थांचा एक छोटा स्टॉल (कियोस्क) सुरू केला होता. तपास अधिकाऱ्यांच्या मते याच काळात त्याने ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि 'एन्क्रिप्टेड' (सांकेतिक) संवाद माध्यमांद्वारे 'आयसिस'शी संबंधित दहशतवाद्यांशी पुन्हा संपर्क साधण्यास सुरुवात केली होती. त्याच्या संशयास्पद हालचाली केंद्रीय आणि राज्य गुप्तचर यंत्रणांच्या निदर्शनास आल्या. त्यामुळे उत्तर प्रदेश एटीएस आणि दिल्ली पोलिसांनी संयुक्त मोहीम हाती घेत त्याला अटक केली. अटकेच्या वेळी त्याच्याकडून काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. ही सर्व सामग्री फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीतून असे संकेत मिळाले आहेत की, रिझवान आपले जाळे विस्तारण्याचा, नवीन सदस्यांची भरती करण्याचा आणि अतिरेकी कारवायांसाठी आवश्यक ती रसद व मदत (लॉजिस्टिक सपोर्ट) उभारण्याचा प्रयत्न करत होता.

कॉन्स्टेबल मुलीने अधिकारी वडिलांना मिल्कशेकमधून विष देऊन केलं ठार
3 वर्षांनी सत्य उघड... अखेर पोलीस खातं हादरलं





चंद्रपूर। चंद्रपुरात मुलीनेच आपल्या पित्याची हत्या केल्याची घटना घडली आहे. चंद्रपूरमध्ये रक्ताच्या नात्यालाच मूठमाती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे कायद्याचे रक्षणकर्ते असलेल्याकडूनच हा प्रकार केला गेलाय. पोलीस असलेल्या प्रत्यक्ष जन्मदात्यालाच पोलीस कर्मचारी असलेल्या लेकीनं यमसदनी धाडलं आहे. यातून रक्ताच्या नात्याला तर कलंक लागलाच, सोबत खाकी वर्दीही डागाळली गेली आहे. खाकी वर्दीतली आर्या बाल्लावार हिनं बॉयफ्रेंडशी लग्न करता यावं म्हणून जन्मदात्या बापालाच संपवलं आहे. आर्या बाल्लावार ही पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून काम करते. आर्या तीन वर्षापूर्वी प्रशिक्षणार्थी पोलीस असलेल्या शेडमाके ह्याच्या प्रेमात पडली होती. आशिषशी आर्याला लग्न करायचं होतं. पण आर्याचे वडील आणि पोलीस कॉन्स्टेबल असलेले जयंत बाल्लावार यांचा या लग्नाला विरोध होता. प्रेमात आंधळी झालेल्या आर्याला काहीही करुन आशिषशी लग्न करायचं होतं. लग्नात अडथळा ठरणा-या जन्मदात्या बापाचा काटा काढण्याचा निर्णय आयार्न घेतला. 25 एप्रिल 2023 रोजी जयंत बाल्लावार कामावर निघाले होते. कामावर जाताना आर्यानं वडिलांना मिल्क शेक बनवून दिल. मिल्कशेकमध्ये तिनं विष मिसळलं होतं. विषयुक्त मिल्कशेक पिऊन जयंत बाल्लावार जिल्हाधिकारी कार्यालयात ड्युटीवर गेले. विष शरीरात भिनल्यानं ते जमिनीवर कोसळले. जयंत बाल्लावार यांचा त्यातच मृत्यू झाला. त्यावेळी अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांचा मृत्यू झाला असं सर्वांना वाटलं. कोणालाही शंका न आल्याने फाईल बंद करण्यात आली. वडिलांचा अडसर दूर झाल्यानंतर आर्यानं आशिष शेडमाके याच्याशी लग्न केलं. पण वडिलांचा रक्ताचा डाग लागलेलं लग्न फारकाळ टिकलं नाही. आशिष शेडमाके हा पोलीस ट्रेनिंगला असताना बेशिस्त वागू लागला. त्याच्या बेशिस्तीमुळं पोलीस दलानं त्याच्यावर बडतर्फीची कारवाई केली. पोलीस दलातली आशिषची नोकरी गेल्यानंतर आर्या आशिषच्या घरी गेलीच नाही. दोघांमधील वाद विकोलापाला गेला तेव्हा आशिषनं आर्यांचं बिंग फोडण्याचा निर्णय घेतला. त्यानं पोलीस ठाणं गाठून आर्यानं वडिलांच्या केलेल्या खुनाची कहाणी सांगून टाकली. पोलीसांनी अकस्मात मृत्यू म्हणून जयंत बाल्लावार यांच्या मृत्यूची नोंद केली होती. पण जयंत बाल्लावार यांचा मृत्यू हा आजारानं झाला नसून त्यांची हत्या केल्याचं तीन वर्षांनी स्पष्ट झालं. आर्यानं वडिलांना मारण्यासाठी मावसभावाकडून 5 हजार रुपयांना विष खरेदी केलं होतं. शिवाय आशिष शेडमाकेहीची मदत घेतली होती. पोलिसांनी विष विक्रेता आणि आर्याच्या मावसभावाला अटक केलीय. प्रेमात आंधळी झालेली मुलगी वडिलांनाही मारायला मागंपुढं पाहणार नाही हे या निमित्तानं अधोरेखित झालं आहे.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com